दाखल तारीख : ०१.०१.२०१८
नोंदणी तारीख : ०१.०१.२०१८
निकाल तारीख : ०३.०५.२०१९
कालावधी: ०१ वर्षे, ०४ महिने, ०२ दिवस

**२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी नेर, जि. यवतमाळ यांचे न्यायालय.**

**(पिठासीन अधिकारी – पि. एस. ठाकरे)**

**नियमित फौजदारी खटला कं. ०१/२०१८ निशाणी क. १६**

महाराष्ट्र शासन मार्फत,
ठाणे अमलदार,
पोलिस स्टेशन, नेर,
ता. नेर, जि. यवतमाळ. ..... **अभियोगपक्ष**

...... **विरुध्द** .......

अनिरूध्द उर्फ बबलु दिवाकरराव गोळे
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
रा. पाथ्रड गोळे, ता. नेर, जि. यवतमाळ .... **आरोपी**

**भारतीय दंड संहिता कलम २९४ व ५०६ अन्वये गुन्हा**

---

श्री. एस. आर. काळे अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील,
श्री. व्हि. एन. ठाकरे आरोपीतर्फे विद्वान वकील हजर.

---

**न्यायनिर्णय**

(**आज दिनांक ०३ मे, २०१९ रोजी पारीत**)

१. प्रस्तुत खटल्यात आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम २९४ व ५०६ नुसार दोषारोप ठेवण्यात आला आहे.

२. **<u>अभियोगपक्षाची पक्षाची संक्षिप्त हकिकत</u> <u>पुढिलप्रमाणे</u>**-

फिर्यादी सौ. सारीका नितीन गोळे व आरोपी हे पाथ्रड गोळे, ता. नेर, जि. यवतमाळ येथील रहीवासी असुन दिनांक २३/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी ही घराच्या बाहेर रोडवर झाडझुड करीता असतांना आरोपी तेथे आला व तिला तु वैश्या आहे, छिनाल आहे, तु लय माजली आहे फोकनीचे अशी अश्लिल शब्दात शिवीगाळ केली. तसेच त्याने तिची जाऊ सुचिता मनोज गोळे हिला सुध्दा फोकनिचे छिनाल मादरचोद अशा अश्लिल भाषेत शिविगाळ केली. तसेच आरोपी हा नेहमी त्यांना शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देत असतो. त्यामुळे तिने पोलीस स्टेशन नेर येथे रिपोर्ट दिला. सदर रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द भारतीय दंड सहिता कलम २९४ व ५०६ अंतर्गत गुन्हा क्रं. ६३४/२०१७ ची नोंद झाली.

३. सदर प्रकरणामध्ये तपास तपासाधिकारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचासमक्ष घटनास्थळ पंचानामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपी विरूध्द पुरावा उपलब्ध झाल्याने या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. **<u>दोषारोप, जबानी व बचाव</u>**

सदर प्रकरणात आरोपी विरुध्द नि.क्र. १० कडे भारतीय दंड संहिता कलम २९४ व ५०६ नूसार दोषारोप निश्चीत केले. तसेच आरोपीची जबानी नि.क्र. ११ कडे नोंदविण्यात आली. आरोपीने त्याच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप नाकारुन खटल्यास पुढे जाण्याची

तयारी दर्शविली. आरोपीविरुध्द प्रत्यक्ष पुरावा नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

५. **निश्चयार्थ मुददे व निष्कर्ष**

अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री. एस. आर. काळे व आरोपीतर्फे विद्ववान वकिल श्री. व्हि. एन. ठाकरे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे करण्यात आलेले आरोप आणि आरोपीचा बचाव या आधारावर खालील मुद्दे निष्कर्षासाठी माझ्या समोर उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सह पुढील प्रमाणे देण्यात आले आहे.

| अ. क्र. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २३/१२/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास पाथ्रड गोळे, ता. नेर जि. यवतमाळ येथे आरोपीने फिर्यादीस " तु वैश्या आहे, छिनाल आहे, तु लय माजली आहे फोकनीचे" व तिची जाऊ सुचिता मनोज गोळे हिला "फोकनिचे छिनाल मादरचोद" अशा अश्लील शब्दात शिवीगाळ करुन इतरांना पिडा पोहचविल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले का ? | . .... नाही |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादी तिच्या जाऊस जिवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्या मनामध्ये फौजदारी स्वरूपाची दहशत निर्माण केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले का ? | ..... नाही |
| ३. | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुददा क. १ व २ करिता :-</u>**

६. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी मुद्ये क्रंमाक १ व २ हे संयुक्तीक रित्या ठरविण्यात आले आहे.

७. आरोपीविरूध्द अपराध सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार क्रं. १ म्हणुन फिर्यादी सौ. सारीका नितीन गोळे हिला नि.क्रं. १३ कडे तपासले. या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये असे आले की, ती आरोपीला ओळखत असुन तो तिचा दिर लागतो. घटना हि एक वर्षापुर्वी पाथ्रड गोळे येथे तिचे घरी घडली. घटनेच्या वेळी तिचा आरोपीसोबत घरगुती कारणावरून शाब्दिक वाद झाला होता. या व्यतिरिक्त काहीही झाले नसल्याचे तिने सांगितले. तिने रागाच्या भरात आरोपीविरूध्द रिपोर्ट दिल्याचे सांगितले. परंतु त्यातील मजकुर बरोबर नसल्याचे सांगितले.

८. या उलट या साक्षीदाराने तिच्या साक्षीत जबानी रिपोर्ट व बयाणामधील अधोरेखांकित भाग वाचुन दाखविला असता तो बरोबर नसल्याचे सांगितले. तसेच तिने तिचे आरोपीसोबत आपसी समजोता झाला असल्याचे मान्य केले. परंतु आपसी समजोता झाला असल्यामुळे ती खोटी साक्ष देत असल्याचे नाकारले. एकंदरीत फिर्यादीची साक्ष व तिने नि. क्रं १२ कडे अभिलेखावर दाखल केलेली पुरसीस लक्षात घेता फिर्यादी व आरोपीमध्ये आपसी समजोता झाला असल्याचे दिसुन येते आणि म्हणुनच फिर्यादी ही आरोपीविरूध्द काही एक सांगत नाही.

त्यामुळे त्याला त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपातून निर्दोष मुक्त करणे आवश्यक आहे. सबब, मी मुददा क्र. १ व २ या मुदयांचे निष्कर्ष **नकारार्थी** देऊन मुददा क्र ३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपीस फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम २९४ व ५०६ या गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन बंधपत्र व जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) नुसार ५०००/-रूपयाचा जामीन बंधपत्र आणि जात मुचलका सादर करावा.

(न्यायासनावर निवेदित व घोषीत).

दि. ०३/०५/२०१९ (पि. एस. ठाकरे),
नेर २ रे न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी, नेर